



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : ३५९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०९ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056





## राज्यात होणार राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी आज व्यक्त केला. देशातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांनी राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलवण्यात येईल अशी घोषणा केली.

बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'सहकार नव-क्रांती मेळावा' कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणन मंत्री जयकुमार रावल, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र



मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### शाह यांचे को-ऑपरेटिव्ह बँकांना मोलाचं आवाहन

देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने, अगदी एका शाखेच्या बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी (सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरशी) जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल, असं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह म्हणाले.

### बँकिंग क्षेत्रातील बदलाची दिली माहिती

अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या अनेक आवश्यक सॉफ्टवेअर सुविधा देखील या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. या अंब्रेला संस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम ही आयोजित करता येतील, जे कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादन करण्यासाठी अंब्रेला संस्था मार्गदर्शक ठरणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील सुमारे १,४०० अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये जवळपास सहा लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. देशाच्या आर्थिक विकासात या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. छोटे दुकानदार, व्यापारी, कुटीर उद्योग, एमएसएमई, स्थानिक व्यावसायिक, महिला बचत गट तसेच मध्यमवर्गीयांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या कर्जांची आवश्यकता असते, असे अमित शाह म्हणाले.

### कोणत्याही हमीशिवाय ५ लाख कर्ज...

मोठ्या बँकांना अनेकदा या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही; मात्र तालुका पातळीवरील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका ही भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतात. कर्जाची रक्कम जितकी कमी तितकी त्याची परतफेडीची शक्यता अधिक असते. कोणत्याही हमी किंवा तारणाशिवाय कर्ज देण्याची मर्यादा आता अडीच लाख रूपयांवरून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. या योजनेतील तब्बल ९९.७८ टक्के कर्जे व्याजासह परतफेड झाली आहेत. यावरून छोट्या कर्जदारांची कर्जफेडीची क्षमता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

## एकाच क्रमांकाच्या दोन हायवा ट्रकने रेती तस्करी

### एकाच ई- टीपीवर लाखोंची रेती !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यासाठी एकाच नोंदणी क्रमांकाचा दोन वेगवेगळ्या वाहनांवर वापर आणि एकाच ई-टीपीवर रेती वाहतूक करणाऱ्या कथित रॅकेटचा चंद्रपूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, रामनगर पोलीस स्टेशन आणि भद्रावती पोलिसांच्या संयुक्त कारवाईत दोन हायवा/ट्रक ताब्यात घेण्यात आले असून, या कारवाईत वाहनांसह रेती असा एकूण ८१ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री रामनगर पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, मूल ते चंद्रपूर मार्गावर दोन वाहने एकाच नंबर प्लेटचा वापर करून अवैध रेती वाहतूक करीत आहेत. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या नेतृत्वाखाली पथकाने पंचांसह नागपूर मार्गावर नाकाबंदी केली.

**पोलिसांना पाहताच हायवाने घेतला नागपूरच्या दिशेने वेग!**

रात्री सुमारे ३ वाजता संशयास्पदरीत्या येणाऱ्या १२ चाकी हायवाला पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने वाहन भरधाव वेगाने नागपूरच्या दिशेने पळवून नेले. पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला. भद्रावती पोलिसांच्या मदतीने घोडपेठ येथे वाहनाला अडवून ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, सुमारे ३.३० वाजता नाकाबंदीच्या ठिकाणी आणखी एक १६ चाकी ट्रक पोलिसांनी थांबवला. दोन्ही वाहनांची तपासणी केली असता पोलिसांनाही धक्का बसला. दोन्ही स्वतंत्र वाहनांवर एकच नोंदणी क्रमांक एमएच-३४-बीझेड-८११४ लावण्यात आला होता. एवढेच नव्हे तर दोन्ही वाहनांमधील रेती वाहतुकीसाठी एकाच ई-टीपी क्रमांक ३३१९८३४७ चा वापर करण्यात आल्याचे तपासात समोर आले.

**दोन वाहनांवर एकच नंबर; महसूल बुडविण्याचा डाव उघड !**

पोलिसांच्या माहितीनुसार, शासनाची फसवणूक करून महसूल बुडविण्याच्या उद्देशाने बनावट ई-टीपी व नंबर प्लेटचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात तीन जणांविरुद्ध रामनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**आरोपी :** स्वप्निल सुरेश कबडे (३७), रा. सावजी नगर, वर्धा - १६ चाकी वाहन चालक, रामकेश राजेश केवट (२०), रा. जि. सीधी, मध्य प्रदेश - १२ चाकी वाहन चालक, रोहन चाफले, रा. खांबाळा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर - वाहन मालक

**या कलमांन्वये गुन्हा दाखल :** आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ३०३(२), ३१८(४), ३३६(३), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७), ४८(८) तसेच खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ मधील कलम ४(१), ४(१-अ) आणि पर्यावरण कायद्यातील कलम ५, १५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे व रामनगरच्या ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सपोनि विरेंद्र केदारे, पोउपनि सर्वेश बेलसरे, पो.हवा. विनोद यादव, गणेश भोयर, जितेंद्र आकारे, अनुप आष्टुंकर, गोपाल आरकुवर, पो.अं. अजित शेंडे, प्रकाश मडावी, राजू चिताडे यांच्यासह पोलिसांचा सहभाग होता.

## गौरी-गणपतीसाठी कोकणात एसटीच्या ५,२२० जादा बसेस धावणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, मुंबई :** श्री गणरायाचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सज्ज झाले आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाने यंदा ७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत ५,२२० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

गणेशोत्सवाच्या जादा वाहतुकीच्या नियोजनासंदर्भात एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच एसटीचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या भावविश्वाशी घट्ट जोडलेला



सण आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नफा-तोट्याचा विचार न करता कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी सज्ज आहे. यंदा सुमारे ५,२२० जादा बसेस कोकणातील विविध मार्गांवर धावणार आहेत.

या जादा बसेसचे आरक्षण पर्लिश्रळल. ीऑलेऑ.ले या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असून, प्रवाशांना बसस्थानकांवर तसेच MSRTC Bus Reservation या अधिकृत मोबाईल ॲपद्वारेही आरक्षण करता येणार आहे.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, नुकत्याच पार पडलेल्या आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटी महामंडळाने ५,२०० जादा बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. त्या सेवेला भाविक व प्रवाशांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्याच धर्तीवर गणेशोत्सवासाठीही मोठ्या प्रमाणावर जादा बसेस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### १० ऑगस्टपासून गट आरक्षणास प्रारंभ...

किमान ४० प्रवाशांच्या गटासाठी १० ऑगस्टपासून गट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गट आरक्षणामध्ये महिला व ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के भाडे सवलत लागू राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त ७ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातील प्रमुख बसस्थानकांतून या जादा बसेसचे संचालन करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवाच्या काळात एसटीची वाहतूक सुरळीत राहावी यासाठी सर्व प्रमुख बसस्थानके आणि बसथांब्यांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहतील. तसेच कोकणातील प्रमुख महामार्गांवर आवश्यक त्या ठिकाणी वाहनदुरुस्ती पथके तैनात करण्यात येणार असून, प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि अखंड सेवा देण्यासाठी सर्वतोपरी व्यवस्था करण्यात आली आहे.

## उपमहापौरांनी दिला 'हरित सोलापूर'चा संदेश ! पर्यावरणपूरक वाहतुकीला प्राधान्य देण्याचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०८, सोलापूर :** वाढते प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेता सोलापूर शहराने पर्यावरणपूरक वाहतुकीकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात १५१ तळवर e-Evooter इलेक्ट्रिक वाहनांच्या भव्य वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांच्या हस्ते या वाहनांचे वितरण करण्यात आले.

यावेळी शोरूमचे मालक बाबू चव्हाण, घनश्याम चव्हाण, लक्ष्मी चव्हाण, पुरुषोत्तम चव्हाण, हिरो कंपनीच्या हनिशा कालरा यांच्यासह कंपनीचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर म्हणाल्या, १५१ इलेक्ट्रिक वाहनांचे वितरण ही केवळ वाहनांची विक्री किंवा वितरण नसून, पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने टाकलेली १५१ सकारात्मक पावले आहेत. या पर्यावरणपूरक उपक्रमासाठी चव्हाण परिवार तसेच हिरो कंपनीच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करते. विकास हवा, पण पर्यावरणाच्या किंमतीवर नाही, हा विचार प्रत्येक नागरिकाने मनात रुजविण्याची गरज




असल्याचे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढल्यास इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यासोबतच शहरातील प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांनाही मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शहराचा विकास म्हणजे केवळ मोठे रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधा नव्हेत. शहरातील हवा स्वच्छ असणे, वातावरण निरोगी राहणे, वृक्षांचे संवर्धन होणे आणि पुढील पिढीला स्वच्छ व सुंदर शहर मिळणे, हा देखील विकासाचाच महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे सोलापूरला स्वच्छ, सुंदर आणि हरित शहर बनविण्याची जबाबदारी प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकाची असल्याचे देवकर यांनी स्पष्ट केले.

आज १५१ वाहने इलेक्ट्रिक झाली आहेत; उद्या ही संख्या १,५००, १५ हजार आणि त्याही पुढे गेली पाहिजे, असे आवाहन करत त्यांनी नागरिकांनी पर्यावरणपूरक वाहतुकीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, वृक्षसंवर्धन, स्वच्छता, प्लास्टिकचा कमी वापर आणि ऊर्जा बचत अशा छोट्या-छोट्या कृतींतून प्रत्येक नागरिक पर्यावरण संवर्धनात योगदान देऊ शकतो. आज पर्यावरणासाठी घेतलेला प्रत्येक सकारात्मक निर्णय हा पुढील पिढीसाठी मोठी संपत्ती ठरेल, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित नागरिकांनीही इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराबाबत सकारात्मक प्रतिसाद व्यक्त केला. पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

एकाचवेळी १५१ Vida e-Evooter इलेक्ट्रिक वाहनांचे वितरण होणे हे सोलापूर शहरात पर्यावरणपूरक वाहतुकीचा वाढता स्वीकार दर्शविणारे सकारात्मक पाऊल ठरले आहे. या उपक्रमामुळे 'हरित सोलापूर' या संकल्पनेला निश्चितच बळ मिळाले असून, शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत जागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# आदिवासींना चिघळून तोडते भूक... अन् फाडते पोटाची लक्तरे...!

संपादकीय

## स्वातंत्र्यदिन इस्रायलचा आणि भारताचा

प्रखर राष्ट्राभिमानी म्हणून आजही इस्रायली नागरिकांचे उदाहरण दिले जाते. तेथे प्रत्येक नागरिकाच्या नसानसांत राष्ट्रप्रेम भिनले आहे. चोहोबाजूंनी बलाढ्य शत्रूंनी वेढलेला हा इवलासा देश आजही या सर्वांना पुरून उरतो तो केवळ नागरिकांमधील अपार देशप्रेम ाच्या जोरावर. इथे प्रत्येक नागरिकाला सैनिकी शिक्षण अनिवार्य आहे. ज्यू कॅलेंडरनुसार 'इयार' महिन्याच्या पाचव्या तारखेला देशाचा स्वातंत्र्यदिन तर ४ थ्या तारखेला 'योम हाझिकारोन' अर्थात राष्ट्रीय स्मृती म्हणजेच शोक दिन साजरा केला जातो. देशाच्या रक्षणासाठी आणि सुरक्षिततेसाठी प्राण पणाला लावणाऱ्या प्रत्येकाप्रती या दिवशी कृतज्ञता व्यक्त केली जाते तसेच आतंकवादी हल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांचेही या दिवशी स्मरण केले जाते. या दिवशी संध्याकाळी ८ वाजता १ मिनिटासाठी सायरन वाजतो, ज्याने या स्मृती दिनाची अधिकृत सुरुवात होते. सायरन वाजताच संपूर्ण देश जागच्या जागी थांबतो. महामार्गावर धावणाऱ्या गाड्या थांबवून चालक बाहेर उभे राहतात. शाळा, कार्यालये, दुकाने यांमधील सर्व लोक स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहतात. पुढील २४ तासांच्या कालावधीत इस्रायलमधील सर्व सिनेमागृहे, नाट्यगृहे, पब, डिस्को आणि इतर मनोरंजनाची ठिकाणे कायद्याने पूर्णपणे बंद असतात. सर्व दूरदर्शन वाहिन्यांवर आणि रेडिओवर केवळ शहिदांच्या शौर्यकथा, इतिहास, आणि देशभक्तीपर गाणी प्रसारित केली जातात. पडद्यावर सतत शहीद सैनिकांची नावे स्क्रोल होत राहतात. नागरिक या दिवशी पांढरे कपडे परिधान करून छातीवर 'यिजकोर' अर्थात 'स्मरण ठेवा' असे लिहिलेले विशेष स्टिकर्स लावतात. इस्रायलचे नागरिक आपल्या स्वातंत्र्यासाठी शहिदांनी दिलेल्या बलिदानाला कधीही विसरू शकत नाहीत. आपल्या भारताचा स्वातंत्र्यदिन काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. आजची तरुणाईही हा दिवस जल्लोषात साजरा करते. पांढरे कपडे परिधान करून, राष्ट्रध्वजाच्या रंगांचा बॅज छातीवर लावून हातात तिरंगा घेऊन सर्वात आधी सोशल मीडियावर सेल्फी कोण टाकणार याची स्पर्धा लागलेली इथे पाहायला मिळते. देशभक्तीपर गीतांचे स्टेटस सोशल मीडिया अकाउंटला पोस्ट केले जातात. हल्ली अनेक खासगी कंपन्यांत पांढऱ्या रंगाचा विशेष ड्रेसकोड ठरवून आदल्या दिवशीच स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो. या दिवशी तिरंगी रंगाचे कपडे परिधान करण्याचीही विशेष क्रेझ आहे. नागरिक आपल्या घरांवर, दुकानावर आणि गाड्यांवर राष्ट्रध्वज लावतात. सर्वत्र देशभक्तीपर गाण्यांचे सूर कानी पडतात. अनेक सोसायट्या, मंडळे, संस्था यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. देशातील नागरिकांचे हे देशप्रेम वर्षातून केवळ दोनच दिवस पाहायला मि ळते. शालेय इतिहासातून आपण क्रांतिकारकांचा आणि देशभक्तांच्या इतिहास अभ्यासला; मात्र आजच्या किती तरुणांना देशासाठी हालअपेष्टा सहन करणाऱ्या, मातृभूम ीचा जयघोष करत बलीवेदीवर चढणाऱ्या किमान १० क्रांतिकारकांची नावे सांगता येतील ? क्रांतिकारकांच्या पराक्रमाच्या गाथा ज्यांना तोंडपाठ असतील. देशासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवून आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांची नावेच जर आपल्याला ठाऊक नसतील तर त्यांचे स्मरण तरी आपण कसे करणार ? सियाचीनसारख्या उच्च पर्वतीय युद्धभूमीवर हिवाळ्यात तापमान -६० अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाते. लडाख आणि सिक्कीम भागातही तापमान -३०अंश सेल्सिअस ते -५० अंश सेल्सिअसपर्यंत जाते अशा रक्त गोठवणाऱ्या थंडीत आपले सैन्य देशाच्या रक्षणासाठी पाय रोवून उभे असते. भारत-पाक सीम ेवरील वाळवंटी भागात उन्हाळ्याच्या दिवसांत कमाल तापमान ४८ ते ५५ अंश सेल्सिअस पर्यंत तीव्र उष्ण असते अशा अग्निसम तापमानात भारतीय सेना डोळ्यात तेल घालून जागता पहारा देत असते. अशा आपल्या सैन्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे तर दूर जंतर मंतरच्या विद्यार्थी आंदोलनात सैन्याला काही कृतघ्न विद्यार्थ्यांनी घाणेरड्या शिव्या दिल्या. अशा नतद्रष्ट लोकांसाठी सैन्याने तरी आपले प्राण का पणाला लावायचे ? आजमितीला देशासमोर अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत. शत्रूराष्ट्र आपल्या सीमा कुरतडत आहेत. दहशतवाद आपल्या घरापर्यंत येऊन पोहोचला आहे. घुसखोरीने साऱ्या देशाला पोखरले आहे. भारतीयांतील हरवत चाललेला देशाभिमान, स्वातंत्र्याचे आणि क्रांतिकारकांच्या बलिदानाचे आपल्याला नसलेले मोल देशासमोरील समस्यांना खतपाणी घालत आहेत त्यासाठी गरज आहे इस्रायलकडून प्रखर राष्ट्राभिमान शिकण्याची !

**- जगन घाणेकर**

---

आजच्या या स्वातंत्र्य भारतामध्ये न्यूजपेपर मधून बातम्या वाचण्यात येतात. नाशिक, नगर, नंदुरबार,अशा विविध ठिकाणी राहणाऱ्या आदिवासीयांना अजूनही पोटाच्या भाकरीसाठी स्वत:च्या मुलांना विकावं लागतं. आदिवासीयांकडून वेठबिगारी केली जाते. वेठबिगारी-कामाधंद्याचा पुरेपुर मोबदला न देता, त्यांच्याकडून जुलूम-जबरदस्तीने काम करुन घेऊन त्यांचे शोषण करुन घेणे. त्यांच्या अज्ञानाचा आणि दुबळेपणाचा फायदा घेऊन, कवडी मोलाच्या मोबदल्यात हवी ती कामे त्यांच्या इच्छेविरुद्ध जाऊन त्यांना धमकावून त्यांच्याकडून बळजबरीने कामे करुन घेतली जाते म्हणजेच वेठबिगारी होय.

आज जणू आदिवासी म्हणजे अश्मयुगीन काळातला माणूस वाटायला लागलाय. मानवाच्या उत्पत्तीपासून माणसात बदल होत गेला. गावांची शहरं झाली. माणसं वेगवेगळ्या ग्रहांवर जायला लागली. अनपेक्षित बदल झाले. गरिबीही घटत आली. तरीही अजूनही आमचा एक भाऊ जंगलातच भटकंती करतोय. आजही तो त्याच अश्मयुगीन जीवन जगतोय. जंगलात राहून पोटाच्या भुकेसाठीच भांडतोय. अजूनही त्याचं गाव जंगलच आहे. या स्वतंत्र भारतात अजूनही शहरांसारख्या सुख-सुविधा आदिवासींच्या अश्मयुगात आजपर्यंत पोहोचल्या नाही म्हणायच्या...

तुटक-तुटक घरांची रचना अजूनही बदलली नाही. अजूनही आमचा आदिवासी या आधुनिक जगाचा हिस्सा बनला नाही. या महासत्ताक होऊ पाहणाऱ्या आपल्या या भारत देशाच्या विकसित विज्ञानयुगापासून आमचा आदिवासी अजूनही वंचित आहे म्हणायचा...

अजूनही आमच्या आदिवासी भावांना असं वाटतंय. माणसाच्या विकासाचा आणि माणसातल्या माणुसकीच्या दुनियेचा शोध अजून लागायचा बाकी आहे. त्या शोधानंतर आपल्याला चांगले दिवस पाहायला, भोगायला मिळतील, या आशेवर तो बिचारा आशा धरुन विकसित माणसाचा शोध लागणार आणि आपलं जीवन बदलणार, अश्या या भंटकंतीच्या प्रवासातून मुक्त होणार आहो. अशी भाबडी आशा धरुन बसला आहे. त्यांना काय माहीत, तो शोध कधीचा लागलाय म्हणून; पण तो शोध तुमच्यापर्यंत राजकीय लोकांनी, देशाच्या सरकारने पोहोचवलाच नाही. तुम्हांला त्यांनी धर्मभ्रष्ट, नक्षलवादी, देशद्रोही असे अनेक आरोप लावून, वेठबिगारी केलय. इयत्ता तिसरीच्या म ाणसाची गोष्ट या इतिहासाच्या पुस्तकाच अश्मयुगीन माणसाचं कवर लावून तुम्हाला अश्मयुगीन काळातच ठेवलय...

आजचा आदिवासी माणूस खरंच इयत्ता तिसरीच्या इतिहासातलाच झाल्यासारखा



आहे, अंगावर कपडे नाही. लिहिता-वाचता येत नाही. घरेही जंगलातल्या पालापाचोळ्यात शेणाम ातीतं लिपलेली. शहरांची सोडा गावांचीही रचना त्यांच्या भागाला नाही. कोण कुठं कोण कुठं राहतो. हेही समजायला तयार नाही. अजूनही आदिवासी माणसं माणसांसोबत कमी आणि जंगली प्राण्यांसोबत जास्त राहतात. त्यांचा बाकी जगाशी काहीच संपर्क नाही. कोण, कुठून, कोठे, काय, कसा, कशाला या कोणत्याच प्रश्नांचे उत्तर या आदिवासींयांना ठाऊक नाही.

आज आम्ही रोबोटमध्ये जीव कसा आणता येईल. याचं संशोधन करतोय. पण आदिवासींना जंगलाच्या बाहेर कसं आणता येईल याचा शोधच अजून लागला नाही म्हणायचा...

आमचं आदिवासी संशोधन जवळजवळ शून्यातच खेळतंय म्हणायचं... भारतीय आदिवासीयांना वाटू द्या. तेही या भारत देशाचे नागरिक आहे. त्यांच्याकडेही नागरिकत्व आहे. त्यांनाही त्यांच्या हक्कासाठी लढणारा माणूस निवडता येतो. आणि त्यांचे हक्क त्यांना मिळतात. एवढं तरी त्यांच्यापर्यंत पोहोचवू द्या. त्यांनाही जगाचे शोध, जगाच्या घडामोडी कळू द्या. त्यांनाही आपण अश्मयुगात नाही, तर आधुनिक युगात राहतोय, याची जाणीव होऊ द्या. त्यांनाही उंच-उंच इमारती पाहू द्या..! उडतं विमान पाहू द्या..! मोठं-मोठ्या धावणाऱ्या गाड्या पाहू द्या...! त्यांनाही संगणक, स्म ार्टफोन वापरुन पाहू द्या...! त्यांनाही पुस्तकं वाचून पाहू द्या.! त्यांनाही नोकऱ्या करताना पाहू द्या..! त्यांनाही उद्योजक म्हणून समाजात वावरताना पाहू द्या ..! त्यांनाही मोठं-मोठ्या शहरांत मोठं-मोठ्या घरांत राहताना पाहू द्या..! त्यांचंही घर फर्निचरनी भरलेलं पाहू द्या..! त्यांनाही मोठं-मोठ्या गाड्यांत फिरताना पाहू द्या..! त्यांनाही, सरपंच, नगरसेवक, नगराध्यक्ष, महापौर, आमदार, खासदार, मंत्री, राष्ट्रपती, पंतप्रधान होताना पाहू द्या..! त्यांनाही आपण या जगाचा, मानवतेचा अविभाज्य हिस्सा आहोत, हे त्यांना कळू द्या..!

माणसाचं लेकरु आहे. माणसातच वाढू द्या..! या भारतीय समाजात त्यालाही माणसाचं स्थान मिळू द्या.

जगाच्या सुख-सुविधांचा लाभ त्यांच्याही नशिबी येऊ द्या. आजच्या या आधुनिक जगात आदिवासी समाज अजूनही पोटाच्या भाकरीसाठी लढताना दिसतोय. कोणत्याच सुख-सुविधा न मागता, फक्त पोटाला भाकर मागणारा आदिवासी त्याचे हे इतकंस जीवनविश्व मानून जगतोय. अजूनही या आधुनिक जगात स्वता:भोवतीच्या

वर्तुळाएवढ्या जगात आपलं जीवन जगतांना दिसतोय. पोटात कुळकुळणाऱ्या भुकेला भागवण्यासाठी

वाट्टेल ते करायला तयार होतोय. देवाने ज्या धम ार्त, संस्कृतीत जन्माला घातलं, तो धर्मही आता तो बदलायला तयार होतोय. मिळेल ते काम करायला तयार होतोय. ते काम चांगलं की वाईट याच्याशी त्याला काही घेणं-देणं नाही.

तो फक्त आपल्या भाकरीसाठी, आपल्या अस्तित्वासाठी झटताना दिसतोय. अशा या जीवाला जीवदान मिळालं पाहिजे. त्याच्या हक्काची, माणूस म्हणून स्वतंत्र ओळख त्याला मिळाली पाहिजे. त्यालाही या आधुनिक काळात जगण्याचा अधिकार दिला पाहिजे. त्यांची जंगलं विकसित नगरे झाली पाहिजे. तिथेही शहर निर्माण झाली पाहिजे. तोही शहराचा भाग झाला पाहिजे. आधुनिक युगाचा नागरिक झाला पाहिजे. हे सर्व बदल घडून यावे यासाठी आपल्या आदिवासी भावासाठी मला सरकारसमोर लोटांगण घालावंसं वाटतं.

काही दिवसांपूर्वी लोकसत्ता या पेपरम धून वाचण्यात आलं. आदिवासी लोकांनी पोटाच्या भाकरीसाठी स्वत:ची मुलं विकली. आज त्यालाही प्रश्न आहे. तो माणूस आहे की नाही. बाकी गोष्टी तर त्यांच्या समजण्यापलीकडच्या आहे.

फक्त भाकरीसाठी आपल्यातला माणूस जंगलात भटकतोय. भाकरीसाठी तो सांगेल ती कामे करायला तयार आहे. त्यांच्याकडे सगळ्यांचंच दुर्लक्ष आहे. आजच्या या काळातही त्यांना सरकारी सुख-सुविधा तर दूरच; त्यांचा मूलभूत सुविधाही त्यांना नाही. पिण्यासाठी पाणी, पोटासाठी रोजीरोटी नाही. रस्ते नाही, शाळा, दवाखाने नाही. या भौतिक सुविधा तर दूरच; आधी त्याला माणूस म्हणून जवळ करायलाही कुणी तयार नाही. आजच्या या आधुनिक काळात कधी-कधी असे वाटायला लागले की, एक दरवाजा अश्मयुगाचा आणि दुसरा दरवाजा आधुनिक युगाचा. आजच्या युगातला आदिवासी समाज पाहिला की जणू अश्मयुगात गेल्यासारखं वाटतं; आणि तंत्रज्ञानाने झपाटलेल्या या विज्ञानयुगाकडे पाहिले की हे आधुनिक युग दिसते. कधी जागेपणी, तर कधी स्वप्नात जगत असल्यासारखे वाटते. नगण्य आदिवासी समाज आज फक्त शिक्षित झाल्यामुळे जंगल सोडून शहराकडे वळले आहे. आणि त्यांच्या शिक्षणामुळे त्यांनी त्यांची स्वत:ची गावं उभी केली आहे. त्यांनीही त्याच्या जीवनशैलीत बदल केला आहे. ते या बदलत्या युगात आपलं अस्तित्व निर्माण करत त्यांच्या हक्काचं, कायद्याने हिसकावून घेण्याचा पुढाकार हळूहळू घेत आहे. बाकीच्या हक्कांच काय जे आज त्यांच्यापर्यंत अजून पोहोचले नाही. मग त्या सरकारी योजना असो वा सरकार असो..!

आमच्यात मिळून-मिसळून राहताना ,काम धंदे करतांना, एकत्रित जेवतांना आमचा आदिवासी भाऊ आम्हांला केव्हा दिसेल आमचे आदिवासी बंधू-भगिनी या महान भारत देशाच्या सर्व जात-धर्म पंथ, समभावात माझा आदिवासी आम्हांला सापडेल का? तो जंगलं सोडून, गावात, शहरात, सापडेल का..? तोही सगळ्यांसारखा, अंगभर कपडे घातलेला, सोशल मीडियावर झळकणारा, बर्गर, पिझ्झा खाणारा, शहराची भाषा बोलणारा, हक्कासाठी भांडणारा, संविधान माझ्यासाठी असा म्हणणारा, मोठं-मोठ्या शाळा, महाविद्यालयांत जाणारा, रेल्वे, विमानात बसणारा, अखखं जग मनमुक्तपणे फिरणारा, नोकरी, व्यवसाय, करता-करवणारा, स्वत:च्या म ार्जीने स्वतंत्र भारतात, आपल्या देशात माया मातीत या तंत्रज्ञानासोबत जगणारा आदिवासी आम्हांला या आधुनिक, तंत्रज्ञान-विकसित विज्ञानयुगातला हा नवा अविष्कार या स्वातंत्र्य भारतात बघायला मिळेल का.?

सत्ताधाऱ्यांनो एकदा आदिवासींच्या पाड्यांवर चक्कर मारा. आदिवासींच्या झोपडीत एकदा विसाव्याला थांबून पहा. त्यांचं म्हणून त्यांच्याजवळ एकदा बसून त्यांच्या भावना एकदा जाणून घ्या..! तरी..! कळेल आपल्याला, काय हा माणसाचा जन्म रे..! कोणत्या जन्माची शिक्षा देव त्यांना भोगायला लावतो रे...! घरात त्यांच्या झोपायला जागा कमी अखख्या घरात धान्य साठवायला मातीच्या कोठ्या असतात. शेणामातीनं लिपलेल्या मातीच्या कोठ्या घरात रचलेल्या असतात. पाण्या-पावसात ,थंडी-वाऱ्यात ,उन्हा-तान्हात. बारक्या-बारक्या लेकऱ्यांना घेऊन कच्चं-पच्चं खाऊन उघड्यावर झोपताना होणारा त्रास उघड्या डोळ्यांनी पाहा हो..!आणि खरच त्यांचा त्रास उघड्या डोळ्यांनी पाहा हो..!आणि समजून घेऊन आदिवासींयांची नोंद वनविभागाच्या प्राण्यांच्या नोंदवह्यासारखी आदिवासी एवढे शिल्लक अशी त्यांची प्राण्यांच्या गिनतीत त्यांची नोंद नसावी; ते या देशाचा भाग आहे. भारत देशाचे नागरिक आहे. म्हणून लोकसंख्येच्या जनगणनेत त्यांची नोंद असावी..!

सन्मानाने जगासमोर त्यांची माणूस म्हणून ओळख असावी..!

**लक्ष्मण गं. वाल्डे, कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं-८८८८६०६०६८**

---

### निमंत्रित

ई डी महाशयांचे
येता निमंत्रण पत्र
मिडीयावाले सजे
चालवते चर्चासत्र

कायकसलेलफडे
घुसळू लागे चरित्र
करु लागे आकांत
आम्ही कसे पवित्र

लोकशाहीसधोका
बोंबाटा होई सर्वत्र
साळसूद स्वच्छता
ड्रायक्लीन सन्मित्र

अतृप्त आत्मे सारे
जमाव करी एकत्र
बाहेरचे नसे कुणी
विवाह करे सगोत्र

काय कसे होणारं
शहारले गात्र गात्र
स्वप्ने पडे भयावह
झोप नाही रात्ररात्र

केले नाही चुकीचे
कशी भेदरली रात्र
स्वच्छ जर रे चरित्र
का थरथरेगात्रगात्र

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

---

# ऑगस्ट क्रांती दिन !

करेंगे या मरेंगे या निर्धारपूर्ण घोषणेने संपूर्ण देशाला प्रेरणा देत ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ मिळाले. हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन किंवा भारत छोडो आंदोलन दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. हा दिवस केवळ इतिहासातील एक घटना नसून भारतीयांच्या अदम्य देशभक्तीचा, त्यागाचा आणि स्वातंत्र्याच्या तीव्र आकांक्षेचा साक्षीदार आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्रजांनी भारतीय नेत्यांचा विश्वासघात केला. भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. याच पार्श्वभूमीवर ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर (आजचे ऑगस्ट क्रांती मैदान) अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात महात्मा गांधींनी भारत छोडो आंदोलनाची घोषणा केली. त्यांनी देशवासीयांना करेंगे या मरेंगे हा मंत्र दिला आणि इंग्रजांनी भारत त्वरित सोडावा, अशी ठाम मागणी केली.

९ ऑगस्टच्या पहाटेच महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनेक राष्ट्रीय नेत्यांना इंग्रजांनी अटक केली. मात्र नेत्यांच्या अटकेने आंदोलन थांबले नाही. उलट संपूर्ण देशभर विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला आणि सामान्य नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरले. अनेक ठिकाणी मोर्चे, संप, निदर्शने, सरकारी कार्यालयांवर बहिष्कार आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र आंदोलन सुरू झाले.

ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडपण्यासाठी लाठीमार, गोळीबार, अटकसत्र आणि कठोर दडपशाहीचा अवलंब केला. हजारो आंदोलनकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले, अनेकांना प्राणांची आहुती द्यावी लागली. तरीही भारतीयांचा स्वातंत्र्याचा निर्धार ढळला नाही. अनेक तरुणांनी भूमिगत राहून गुप्तपणे आंदोलन सुरू ठेवले. अरुणा आसफ अली, उषा मेहता, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया यांसारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या आंदोलनाला नवे बळ दिले. उषा मेहतांनी सुरू केलेल्या गुप्त काँग्रेस रेडिओने स्वातंत्र्याचा संदेश देशभर पोहोचवला.

या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेचा पाया हादरवला. इंग्रजांना हे स्पष्ट झाले की भारतीयांना कायम गुलाम ठेवणे आता अशक्य आहे. जरी १९४२ मध्ये स्वातंत्र्य मिळाले नाही, तरी याच आंदोलनामुळे स्वातंत्र्यप्राप्तीची प्रक्रिया वेगाने पुढे सरकली आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

आज स्वातंत्र्यानंतर जवळपास आठ दशके उलटून गेली असली, तरी ऑगस्ट क्रांती दिनाचे म हत्त्व अजूनही तितकेच आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे; तर लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाचा सन्मान, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता आणि नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिक पालन हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या पिढीने स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घ्यावी. देशप्रेम, प्रामाणिकपणा, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देण्याची भावना प्रत्येक भारतीयाम ध्ये रुजली, तर तीच ऑगस्ट क्रांती दिनाला खरी आदरांजली ठरेल.

ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील निर्णायक टप्पा असून, लाखो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. त्यांच्या संघर्षामुळेच आपण आज स्वतंत्र भारतात मुक्तपणे जगत आहोत. त्यामुळे हा दिवस प्रत्येक भारतीयाने अभिमानाने, कृतज्ञतेने आणि राष्ट्रनिष्ठेच्या भावनेने साजरा करणे हेच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पारनेर येथे पतसंस्था पदाधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

## पतसंस्थांना सरकारी संरक्षण द्या - आ.दाते यांची मागणी

## सहकार हा राजकारणाचा अड्डा नाही




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांचा आर्थिक आधार असलेल्या पतसंस्था चळवळीला राज्य सरकारने संरक्षण द्यावे. पतसंस्थांच्या ठेवींना हमी मिळाल्यास ठेवीदारांचा विश्वास वाढेल आणि या चळवळीला नवे बळ मिळेल, असे प्रतिपादन पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन आणि पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ०८ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर येथे पतसंस्था पदाधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन आमदार दाते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले, साखर कारखाने अडचणीत आले की सरकार तातडीने मदतीला धावते. परंतु पतसंस्था अडचणीत आल्यास सहकार खात्याकडून कोणतीही मदत मिळत नाही. हा दुजाभाव दूर झाला पाहिजे.

काही अपप्रवृत्तींनी पतसंस्था चळवळीत राजकारण आणून संस्थांना बुडवण्याचा प्रयत्न केला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. सहकार हा राजकारणाचा अड्डा नाही. ही चळवळ जनतेच्या हितासाठी आहे. असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. पतसंस्था चळवळीला बळ देण्यासाठी आपण विधानसभेत आणि सरकार दरबारी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत पतसंस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि सक्षम कसे होईल यावर भर देण्यात आला. यामध्ये कलम १०१ अंतर्गत थकबाकी वसुली, ऑडिट व्यवस्थापन, सायबर सुरक्षेचे धोके आणि संचालकांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे,नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, माजी सहनिबंधक तानाजी कवडे, संचालक भास्कर बांगर यांच्यासह जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी आणि संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना वसंत लोढा यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्यात पारनेर तालुका आर्थिकदृष्ट्या सर्वात सक्षम आहे. येथील पतसंस्थांचा छझअ देखील अत्यंत कमी असून हे चांगल्या व्यवस्थापनाचे उदाहरण आहे.

---

# मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांची सदिच्छा भेट

## भाजप कामगार आघाडीच्या महामंत्र्यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** मुंबई येथील मातोश्री निवासस्थानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांची चंद्रपूर जिल्ह्यातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी पक्षाच्या आगामी संघटनात्मक बांधणी, स्थानिक राजकीय परिस्थिती तसेच जनतेच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पक्षाचे सचिव तथा माजी खासदार विनायक राऊत तसेच चंद्रपूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रशांतदादा कदम यांचीही पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन जिल्ह्यातील पक्षसंघटनेच्या बळकटीकरण याबाबत चर्चा केली. याच प्रसंगी भाजप कामगार आघाडीचे महामंत्री आशिष रांदिवे यांनी पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे चंद्रपूर जिल्ह्यात पक्षाला अधिक बळ मिळणार असून अनेक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. यावेळी पक्षाचे सचिव विनायक राऊत, विधान परिषद आमदार मिलिंद नार्वेकर, चंद्रपूर जिल्हाप्रमुख भास्कर ताजने, चिमूर - ब्रह्मपुरी विधानसभा संपर्कप्रमुख दिलीपदादा कदम, वरोरा उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, विधानसभा प्रमुख बंडू डाखरे, माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर डुकरे, तालुकाप्रमुख नरेश काळे, तालुका संघटक सचिन डुकरे, ब्रह्मपुरी माजी उपजिल्हाप्रमुख मिलिंद भानारे, तालुकाप्रमुख नरेंद्र गडगीलवार, शहर प्रमुख भूषण रामटेके, शिवसैनिक वैभव ठाकरे, युवासेना शहरप्रमुख सूरज ठावरे तसेच अन्य पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची विचारधारा, निष्ठा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने सुरू असलेल्या संघर्षावर विश्वास व्यक्त करत अनेक कार्यकर्ते पक्षाकडे आकर्षित होत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात पक्षसंघटना अधिक मजबूत करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा अधिक जोमाने फडकविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

# पनवेल, सेक्टर २०-२१ मधील रस्त्यांची चाळण; खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त

## रिक्षा-टॅक्सी चालकांकडून अतिरिक्त भाड्याची मागणी; पथदिव्यांअभावी रात्रीचा प्रवास धोकादायक





**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०८, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल शहरातील सेक्टर २० आणि २१ या मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यामुळे रस्त्यांची अवस्था आणखी बिकट झाली असून प्रशासनाच्या उदासीनता विरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या मार्गावर दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने तसेच शाळकरी विद्यार्थ्यांची वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना खड्डे चुकवत वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत असून, किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

### खड्ड्यांचा आर्थिक फटका ही नागरिकांना

रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांच्या खिशालाही मोठा फटका बसत आहे.

खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून दुरुस्तीचा अतिरिक्त खर्च वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर खराब रस्त्यामुळे रिक्षा आणि टॅक्सी चालक या मार्गावरून जाण्यास टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. काही चालक प्रवासासाठी तयार झाले तरी खराब रस्त्याचे कारण देत अतिरिक्त, काही वेळा दुप्पट भाड्याची मागणी करत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.पावसाळा सुरू होऊन महिन्याहून अधिक कालावधी लोटला असतानाही संबंधित विभागाकडून रस्त्यांची आवश्यक दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### पथदिव्यांअभावी रात्रीचा प्रवास धोकादायक

या मार्गावर अनेक ठिकाणी पथदिव्यांची पुरेशी सुविधा नसल्याने रात्रीच्या वेळी वाहन चालवणे अधिक धोकादायक ठरत आहे. अंधार आणि रस्त्यावरील खड्डे यामुळे वाहनचालकांना रस्त्याची स्थिती स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

संबंधित प्रशासनाने तातडीने रस्त्यांची पाहणी करून खड्डे बुजवावेत, रस्त्यांची दुरुस्ती करावी तसेच आवश्यक त्या ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. समस्या तातडीने सोडविण्यात आली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

### सिडको प्रशासनाची प्रतिक्रिया

याबाबत सिडकोच्या जनसंपर्क अधिकारीप्रिया रतांबेयांनी सांगितले, मी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलते. सदर रस्ता सिडकोच्या हद्दीत येत असेल, तर लवकरात लवकर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यास सांगते.त्यामुळे आता संबंधित रस्ता सिडकोच्या अखत्यारित येतो की नाही, याची पाहणी करून प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम कधी सुरू होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

## थोडक्यात बातम्या

### मुक्रमाबादेत अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०७ , मुक्रमाबाद (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील अण्णाभाऊ साठे समाज मंदिर येथे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्य रत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मुक्रमाबाद नगरीच्या सरपंच अंजिताताई बोधणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांचे शाल पुष्पहार देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षण सभापती तथा राष्ट्रवादी अजितदादा गटाचे राज्य उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर होते. यावेळी शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर, ग्रा.प.सदस्य तथा सरपंच प्रतिनिधी बालाजी बोधणे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे सपोनि राजेशजी चव्हाण,सुभाष अप्पा बोधणे, तमप्पा गंदिगुडे, बालाजी पसरगे, शंकरप्पा खंकरे, शुकुरसाब कुरेशी, जळबा गुमडे,आरपिआयचे माणिकराव गायकवाड, प्रशांत मेटकर, राम कांबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.जगदिश गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे प्रितम गवाले, लक्ष्मण एनमुलवाड, अब्दुल पटेल, तंटामुक्तीचे अध्यक्ष गौसखाँ पठाण, शिवओम पाटील, नामदेव सुर्यवंशी, सुनिल गायकवाड, ईसा चौधरी, उत्तमराव गुमडे,वंडगीर येथील पो.पा. गणपतराव जाधव, फतरुसाब बेग, मा.ग्रा.सदस्य काशिनाथ ईंदुरे, व्हाईस आफ मिडियाचे अध्यक्ष शाकेर काजी, अध्यक्ष रज्जाक करुशी, सचिव बस्वराज वंटगिरे, रमेश राचलवार, जलील पठाण सहित परिसरातील समाज बांधव उपस्थित होते. आपल्या अध्यक्षिय भाषणात बोलताना मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, मुक्रमाबाद शहर हे भविष्यात आता तालुक्याचे शहर होणार आहे. याठीकाणी मातंग समाजाची संख्या फार मोठी आहे, जर ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करुन दिले तर माझ्या तर्फे साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याची जबाबदारी मी घेईन. समाजाच्या कार्यकर्त्यांनी पुतळा निवडावा आणि पुढील वर्षात नव्या जागेत पुर्णाकृती पुतळ्याचे अणावरण करुन त्याच ठीकाणी जयंती साजरी कराल अशी अपेक्षा व्यक्त केले. सूत्रसंचालन अशोक लोणीकर यांनी केले तर आभार दादाराव गुमडे यांनी केले. हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी जयंती मडंळाचे अध्यक्ष भिमराव बोयवार, सदाशिव बोयवार,लालबा बोयवार, श्रीरंग कांबळे, राजकुमार कांबळे, वामण बोयवार, परशुराम बोयवार आदींनी परिश्रम घेतले.

---

### सुरंगीच्या सुगंधाने निसर्गोद्यान दरवळणार - महापौर, आयुक्त व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** सध्याची वातावरणाची स्थिती पाहता पर्यावरण संरक्षण व संवर्धनाला पर्याय नाही हे लक्षात घेत योग्य प्रकारे झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी नागरिकांना यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी 'हरित प्रभाग' अर्थात 'ग्रीन वॉर्ड' स्पर्धा राबविण्याची संकल्पना जाहीर केली. या पर्यावरणपूरक वृक्षारोपण संवर्धन अभियानात सर्व प्रकारच्या संस्था, मंडळे, नागरिक यांनी आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी स्वयंस्फुर्तीने सहभागी व्हावे असेही आवाहन महापौरांनी केले. नवी मुंबई महानगरपालिका उद्यान विभागाच्या वतीने सेक्टर १४ कोपरखैरणे येथील निसर्गोद्यानामध्ये 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित वृक्षारोपण समारंभप्रसंगी त्या उपस्थितांशी संवाद साधत होत्या. यावेळी महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, प्रभाग समिती अध्यक्ष चंद्रभागा मोरे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, पाणीपुरवठा समिती सभापती रविकांत पाटील, विधी समिती सभापती अ‍ॅड.सायली शिंदे, नगरसेवक संदीप म्हात्रे, डी.आर. पाटील, नगरसेविका अ‍ॅड.भारती पाटील, दिक्षा कचरे, मिनाक्षी पाटील आणि उद्यान विभागाच्या उपआयुक्त स्मिता काळे, कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे, सहा. उद्यान अधिकारी भालचंद्र गवळी, उद्यान अधिक्षक विजय कांबळे, उद्यान सहाय्यक श्रीकांत जाधव तसेच मोठ्या संख्येने उपस्थित विविध संस्थांचे पदाधिकारी, शाळा - महाविद्यालयांचे मुख्याध्यापक- शिक्षक- विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी सर्वांनी मिळून जागरूकतेने प्रयत्न करण्याची गरज विषद करीत ही आपल्या अस्तित्वाची लढाई असल्याचे सांगितले. विकास हा पर्यावरणाची काळजी घेऊनच व्हायला हवा हे स्पष्ट करीत नवी मुंबई क्षेत्रात होणारी वृक्षलागवड ही जैवविविधतेला नजरेसमोर ठेवून प्राधान्याने देशी प्रजातीच्या झाडांचीच होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.नवी मुंबई महानगरपालिकेस पर्यावरण विषयक कामात सहकार्य करणाऱ्या संस्थांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाल. सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये सुरंगी वृक्षरोपे पुरवठा करणारे ऑरम फाऊंडेशन, कॉन्सर्टो प्रा.लि. महापे, डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग, श्री आदिशक्ती निर्मलादेवी संस्था कोपरखैरणे, संत धन निरंकारी मंडळ कोपरखैरणे, श्रीविठ्ठल रखुमाई भजनी मंडळ कोपरखैरणे, मोरया सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ कोपरखैरणे, ज्ञानविकास संस्था कोपरखैरणे, क्राईस्ट अकॅडमी स्कुल सेक्टर २३ कोपरखैरणे, नमुंमपा शाळा क्र.३६ कोपरखैरणेगाव, सुनिल किंद्रे युवा फाऊंडेशन या सहयोगी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानीत करण्यात आले.

यावेळी विशेषत्वाने कर्नाटक राज्यातून आणलेल्या सुरंगी झाडाच्या ४ ते ५ फूट वाढलेल्या २०० वृक्षरोपांची निसर्गोद्यानात मान्यवर व नागरिकांच्या हस्ते लागवड करण्यात आली. सुरंगी हे मध्यम आकाराचे सुगंधी फुलांचे सदाहरित झाड प्रामुख्याने त्याच्या लोभस सुगंधासाठी व फुलांच्या अनोख्या रचनेसाठी ओळखले जाते. या वृक्षारोपणामुळे निसर्गोद्यानातील हा पट्टा सुरंगीच्या सुगंधाने आसमंत दरवळून टाकणार आहे.